3 ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !

पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी ॲण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी

प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३०८ वा ● शुक्रवार, ता. १६ मे २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

# भूषण गवईंचा पहिला शॉक नारायण राणेंना

## पुण्यातील वनजमिन जागेचा लावला पक्का निकाल

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशाच्या सरन्याधीशपदी भूषण गवई यांनी शपथ घेतल्याबरोबर पुण्यातील वनजमिनीच्या एका खटल्यासंदर्भात निकाल देत नारायण राणेंना पहिला शॉक दिला. हा खटला खा. नारायण राणे यांच्याशी संबंधित २७ वर्षांपूर्वीचा आहे. नारायण राणे १९९८ मध्ये युतीच्या सरकारमध्ये महसूल मंत्री होते. त्यावेळी तीस वर्षांपुर्वी राणेंनी पुण्याच्या कोंढवा भागात वनखात्याची ३० एकर जमीन एका बिल्डरला देऊ केली पण त्यांचा हा आदेश रद्द करत ही वनजमीन पुन्हा सरकारला देण्याचे आदेश सरन्यायाधिश भूषण गवई यांनी दिले. हा निकाल देताना त्यांनी या प्रकरणावर कठोर शब्दांत ताशेरे ओढले. राजकारणी, प्रशासकीय अधिकारी आणि खासगी बिल्डर यांच्या संगनमताने अशा गोष्टी होतात हे चांगले उदाहरण असल्याचे गवई म्हणाले. हा जमिनीचा व्यवहार करताना पुरातत्व खात्याच्या नोंदींमध्ये फेरफार करण्यात आले होते, हे देखील कोर्टात सिद्ध झाले. यासाठी अत्यंत नियोजनबद्ध संगनमताने घोटाळा करण्यात आला. तत्कालीन महसूल मंत्री नारायण राणे यांनी चव्हाण नामक एका व्यक्तीला वनखात्याची ३० एकर जागा देण्याचा निर्णय घेतला. ही जमीन ताब्यात येताच या व्यक्तीने ही आपली शेतजमी असल्याचे दाखवत रिची रिच या प्रोजक्टसाठी दोन कोटी रुपयांना विकली. पण ही शेतजमीन असल्याने त्यावर बांधकाम करता येत नव्हते.

त्यासाठी प्रशासन धावून आले आणि तत्कालीन विभागीय आयुक्त राजीव अग्रवाल, जिल्हाधिकारी विजय माथनकर आणि उपवन संरक्षक अशोक खडसे यांनी या जागेला बिगरशेती प्रमाणपत्र दिले सीटी ग्रुपचे अनिरुद्ध देशपांडे, ऑक्सफर्ड प्रॉपर्टिज आणि राहेजा बिल्डर यांनी एकत्र येत ही रीची रिच सहकारी सोसायटी स्थापन केली. पण हा गैरप्रकार असल्याचे लक्षात आल्यानंतर पुण्यातील सजग चेतना मंचने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली. पुण्याच्या मध्यवर्ती भागातील वनजमीनीवर प्रकल्प झाल्यास त्याचा पर्यावरणावर विपरित परिणाम होईल, अशी भीती यात व्यक्त करण्यात आली होती. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने या याचिकेची गंभीर दखल घेत सन २००२ मध्ये सीईसी अर्थात सेन्ट्रल एम्पावर्ड कमिटी स्थापन केली. त्यानंतर या समितीने पुण्यातल या जागेची प्रत्यक्ष पाहाणी करुन सुप्रीम कोर्टाला आपला अहवाल पाठविला. यामध्ये राणेंसह प्रशासकीय अधिकारी आणि वन अधिकाऱ्यांवर ठपका ठेवण्यात आला.



त्यानंतर ही जागा बिगरशेती असल्याचे रेकॉर्डही तपासण्यात आले. याबाबतच्या ब्रिटिशकालीन रेकॉर्डमध्ये फेरफार केल्याचे सिद्ध झाले. सन २०२४ मध्ये याप्रकरणाचा सीआयडीने तपास केला आणि यातील अनियमिततेच्या गोष्टी सुप्रीम कोर्टाच्या निदर्शनास आणून दिल्या. आता सुप्रीम कोर्टाने हा संपूर्ण व्यवहार रद्द करत कोंढव्यातील ३० एकर जमीन पुन्हा वनखात्याला देण्याचे आदेश दिले. याची पार्श्वभूमी सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी सांगितली, सन १८७९ मध्ये कोंढवा बुद्रुकमधील ३२ एकर जमीन आरक्षित वनजमीन म्हणून जाहीर झाली होती.

१९३४ मध्ये केवळ ३ एकर जमीनच अधिकृतपणे डि-रिझर्व्ह झाली. उरलेली २९ एकर जमीन अजूनही वनजमीनच होती. १९६० च्या दशकात 'चव्हाण' कुटुंबाची जमीन कुष्ठरोग रुग्णालयासाठी संपादित करण्यात आली. त्यांना १९६८ मध्ये १ वर्षासाठी शेतीसाठी भाडेपट्टीने जमीन देण्यात आली. त्याच्या अटी अशा होत्या. विक्री, हस्तांतरण, अन्य वापर नाही. त्याचा भाडेपट्टी कधीच नूतनीकरण झाला नाही. पण तरीही १९९८ मध्ये राजकीय दबावाखाली, ही जमीन स्थायीरित्या चव्हाण कुटुंबाला देण्यात आली आणि लगेचच नावाच्या बिल्डरला लक्झरी टॉवर बांधण्यासाठी विकली गेली. या विषयी सर्वोच्च न्यायालयाने काय म्हटले ते कुंभार यांनी निदर्शनास आणून दिले, ते असे हे संपूर्ण वाटप व विक्री पूर्णतः बेकायदेशीर होती.

२००७ मध्ये दिलेली पर्यावरण मंजूरी रद्द करण्यात आली. राज्य महसूल विभाग, वन विभाग व अधिकाऱ्यांची जबाबदारी ठरवली. जमीन ३ महिन्यांत वनविभागाकडे परत द्यावी, असा स्पष्ट आदेश देण्यात आला. प्रत्येक राज्य/केंद्रशासित प्रदेशात विशेष चौकशी समित्या स्थापन करण्याचे कोर्टाने निर्देश दिले. गंभीर इशारा असा देण्यात आला की, हा प्रकार म्हणजे राजकारणी, नोकरशहा आणि बिल्डर यांचे संगनमत कसे लोकशाही व कायद्या-नियमांची थट्टा करते, याचे क्लासिक उदाहरण आहे.

वनसंपदा लुटली गेली, पर्यावरणाला धोका दिला गेला आणि संपूर्ण यंत्रणेला फसवले गेले.

पुढे विजय कुंभार म्हणाले, यातून संदेश स्पष्ट आहे, वनजमीन विक्रीसाठी नाही. विकास हवाच पण तो निसर्ग आणि कायद्याच्या किमतीवर नाही.

# स्थानिक स्वराज्य संस्था प्रभाग फेररचना करा

## निवडणूक आयोगाचे राज्य सरकारला आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका येत्या चार महिन्यांत घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी दिले होते. त्यानंतर आता राज्य निवडणूक आयोग सक्रिय झालं आहे. त्याच पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगान सरकारला महत्वाचे आदेश दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने फेर प्रभाग रचना करा असे निर्देश सरकारला देण्यात आला आहेत. ६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात महत्वाचे निर्देश दिले होते. 'चार महिन्यांच्या आत रखडलेल्या निवडणुका घ्या' असं सुप्रीम कोर्टाने सांगितलं होतं. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक ठराविक वेळेत घ्या. उर्वरित वादाचे मुद्दे टाळा, असे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले होते.त्याच पार्श्वभूमीवर आता राज्य निवडणूक आयोगाने सरकारला महत्वाचे निर्देश दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने फेर प्रभाग रचना करा, असे आदेश देण्यात आले आहेत. निवडणुका घेण्यासाठी महापालिका, नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या प्रभाग रचना तयार करण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे आदेश आयोगाने राज्य सरकारला बुधवारी दिले. तसेच, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या गट आणि पंचायत समित्यांच्या गणांची रचना करण्याचे आदेशही देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे राज्य सरकारला पालिकांची प्रभाग रचना, तसेच गट आणि गणांची फेररचना करण्याची प्रक्रिया सुरू करावी लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या म्हणजे महापालिकेच्या निवडणुका कधी होणार? याकडे सर्वांचंच लक्ष लागलं होतं. मात्र ६ मे रोजी, सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यात निवडणुका घेण्याचे आदेश राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. त्यामुळे राज्यात सप्टेंबरमध्ये निवडणुका होणार आहेत. ६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीबाबतची सुनावणी झाली. तराज्यातील संभाजीनगरसह अनेक महापालिकेत पाच वर्षापासून निवडणुका झाल्याच नसल्याचं आणि प्रशासक तिथे काम करत असल्याचं, त्यानेळी सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आलं. लोकशाहीसाठी हे योग्य नसल्याचंही कोर्टाच्या लक्षात आल्यानंतर कोर्टाने येत्या चार आठवड्यात निवडणुकीच्या नोटिफिकेशन्स काढण्याच्या आणि चार महिन्यात निवडणुका घेण्याचे आदेश दिले. त्यामुळे येत्या सप्टेंबर महिन्यापर्यंत या निवडणुका होणार आहेत.



श्रीरामपूर मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष,अँकर्स असोसिएशनचे माजी कार्याध्यक्ष विद्यमान सल्लागार सलीमखान पठाण हे यावर्षी हाजी यात्रेस रवाना होत असल्याने अँकर्स असोसिएशन तर्फे त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. ॲड. आदिनाथ जोशी, सचिव प्रवीण जमदडे, अवधूत कुलकर्णी, गणेश पिंगळे व चिरंजीव साई पिंगळे.

# गुरुदास रेडकर यांच्या 'क्रांतिसूर्य' पुस्तकावर १७ मे रोजी चर्चा

**पर्वरी । प्रतिनिधी**






गोमंतक मराठी अकादमी आयोजित मासिक पुस्तक चर्चा कार्यक्रमात लेखक गुरुदास रेडकर यांच्या 'क्रांतिसूर्य' या वैचारिक लेखसंग्रहावर चर्चा होणार आहे. गुरुदास रेडकर यांचे 'क्रांतीसुर्य' हे पुस्तक पुणे येथील लोकसंस्कृती प्रकाशन आणि जुन्नर येथील सनय प्रकाशन यांनी प्रकाशित केले. शनिवारी ता. १७ मे रोजी सायंकाळी ४ वाजता पर्वरी येथील गोमंतक मराठी अकादमी सभागृहात कार्यक्रम होईल. चर्चासत्राचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक शंभू भाऊ बांदेकर हे उपस्थित असतील. क्रांतिसूर्य पुस्तकावर समीक्षक तथा प्रमुख वक्ते मिलिंद माटे आपले विचार मांडतील. विशेष उपस्थिती म्हणून गोमंतक मराठी अकादमीचे सदस्य, पत्रकार प्रभाकर ढगे उपस्थित राहतील. गोव्यातील सामाजिक समतेची चळवळ आणि दलित समाजातील परिवर्तन या अनुषंगाने लेखकाने या पुस्तकात वैचारिक लेखन केले आहे. या महत्त्वाच्या पुस्तक चर्चा कार्यक्रमास जास्तीत जास्त साहित्य रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष प्रदीप घाडी आमोणकर यांनी केले.

# माझे सांडलेले रक्त कारणी लागले- हेरंब कुलकर्णी

## एनर्जी ड्रिंकवरही बंदी घालावी

**अकोले । प्रतिनिधी**



शिक्षण विभागाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या नियमावलीत शाळेच्या परिसरात एक किलोमीटरमध्ये तंबाखूजन्य पदार्थ विकले जाणाऱ्या पानटपऱ्या नसाव्यात, असे आदेशित केले. या निर्णयाचे मी स्वागत करतो कारण दीड वर्षापूर्वी मी शाळेच्या शेजारी असलेली पानटपरी हटवली म्हणून माझ्यावर सुपारी देऊन प्राणघातक हल्ला झाला होता.

आज माझे सांडलेले रक्त कारणी लागले, अशी प्रतिक्रिया हेरंब कुलकर्णी यांनी दिली. ते पुढे म्हणाले, फक्त याची अंमलबजावणी करताना शाळेच्या मुख्याध्यापक यांच्यावर जबाबदारी टाकताना त्या गावातील ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपंचायत महापालिका व पोलिस यांच्यावरही जबाबदारी निश्चित करण्याची गरज आहे. किंबहुना १५ जूनला शाळा सुरू होण्यापूर्वी प्रशासनाने शाळेभोवती असणाऱ्या सर्व टपऱ्या काढून द्याव्यात. त्यासोबतच लहान मुलांसाठी बनवलेली एनर्जी ड्रिंक ही अतिशय घातक आहेत. त्यात येणारी उत्तेजना आणणारी द्रव्यही अतिशय घातक घटक असतात. ते मुलांना अंमली पदार्थांकडे नेतात. त्यामुळे शाळेच्या परिसरात ती एनर्जी ड्रिंक विकली जाणार नाहीत, असाही नियम हवा. राज्य सरकारने या द्रव्यांची तपासणी करून त्यावर बंदी घालावी. त्याचबरोबर पालकांनी विद्यार्थ्यांना पैसे देऊ नयेत व शाळांनी विद्यार्थ्यांच्या दप्तर, खिसे तपासण्याची गरज आहे, कारण मध्यंतरी नाशिक जिल्ह्यात एका शाळेत विद्यार्थ्यांच्या दप्तरात कंडोम पासून मारामारीची हत्यारेही सापडली होती.

# भूसंपादनकडून अद्यापही न्याय नाही; भूमिहीन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे आंदोलन तीव्र

## न्यायासाठी चार वर्षांपासून संघर्ष

**पुणे । गौरव लष्करे**

अहमदनगर जिल्हा श्रीगोंदा तालुक्यातील अजणून येथील भूमिहीन प्रकल्पग्रस्त शेतकरी गेली चार वर्षे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, सिंचन भवन पुणे येथे आपल्या हक्कांसाठी उपोषण व आंदोलन करत आहेत. भूसंपादन करूनही अद्याप त्यांना न्याय मिळालेला नाही. अतिक्रमण हटवण्यासाठी पोलिस संरक्षण मिळून कारवाई व्हावी, अशी सातत्याने मागणी करण्यात आली मात्र शासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

आंदोलक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, राजकीय पुढाऱ्यांच्या मध्यस्तीने कायदा व सुव्यवस्थेचा भंग केला जात आहे. त्रयस्थ व्यक्तींना राजकीय पाठबळ दिले जात असून, अधिकाऱ्यांकडून घटनात्मक नियमांना धाब्यावर बसवले जात आहे. शासनाचे अधिकारी सत्ताधारी नेत्यांच्या सूचनेनुसार काम करत असून, सर्वसामान्य प्रकल्पग्रस्तांचे दुःख दुर्लक्षित केले जात आहे. आंदोलकांनी स्पष्टपणे सांगितले की, हे आंदोलन संविधानाच्या चौकटीत असून, लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला न्याय मिळालाच पाहिजे. "राजकीय लोक दररोज बदलतील, पण संविधान हा न्यायाचा मूलाधार आहे. त्याचा आदर झाला पाहिजे," अशी ठाम भूमिका आंदोलकांनी मांडली आहे. शेतकऱ्यांच्या या दीर्घकाळ चाललेल्या आंदोलनाची दखल शासनाने घेणे गरजेचे आहे. अन्यथा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होईल, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे. यावेळी आंदोलनात अनिल क्षीरसागर, अरुण क्षीरसागर, जालिंदर गिरमकर, मारुती गायकवाड, गोरख क्षीरसागर, संजय क्षीरसागर, अक्षय क्षीरसागर, दिलीप क्षीरसागर, अनिल क्षीरसागर, सचिन क्षीरसागर, मनीषा क्षीरसागर, पदमबाई क्षीरसागर, वंदना क्षीरसागर आदी सहभागी होते.



# राज्य सरकारकडून १८ लाख रेशनकार्ड बंद

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

महाराष्ट्रातील ६ कोटी ८५ लाख रेशन कार्डधारकांपैकी जवळपास १८ लाख रेशन कार्डधारकांची रेशनकार्ड रद्द करण्यात आले आहे. यामुळे अपात्र असतानाही रेशनचा लाभ घेणाऱ्या लोकांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार आतापर्यंत राज्यातील तब्बल १८ लाख रेशन कार्डधारकांची रेशनकार्ड रद्द झाले असून आगामी काळात ही संख्या आणखी वाढणार आहे.

सरकारच्या रेशनचा अनेक लोक पात्र नसतानाही लाभ घेत असल्याचे उघडकीस आले होते आणि यामुळे अशा लोकांवर कारवाई होणे अपेक्षित होते. याच अपात्र लोकांवर कारवाई व्हावी या अनुषंगाने अपात्र लोकांची ओळख पटवण्यासाठी शासनाने एक विशेष मोहीम हाती घेतली होती. राज्यातील अपात्र रेशनकार्ड धारकांची ओळख पटवण्यासाठी रेशनकार्ड ई-केवायसीची मोहिम सरकारकडून हाती घेण्यात आली. या मोहिमेमुळे सरकारच्या अन्नधान्यावर डल्ला मारणाऱ्या लाखो लोकांवर कारवाई करण्यात आली.

अनेक जण गलेलठ्ठ पगार, सरकारी नोकरदार, व्यापारी, व्यावसायिक, श्रीमंत असताना सुद्धा सरकारच्या रेशनचा लाभ घेत होते. खरंतर सरकारी रेशन हे फक्त गरीब लोकांसाठी आहे मात्र याचा लाभ अनेक श्रीमंतांकडून घेतला जातोय. अनेकजन सरकारी अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विविध खासगी कंपन्यांतील गलेलठ्ठ पगारदार, व्यापारी आहेत मात्र त्यांच्याकडेही रेशन कार्ड आहे. हे लोक दर महिन्याला सरकारकडून दिले जाणारे रेशन उचलतात आणि ते लोक दुसरीकडे धान्याची विक्री करतात. एवढेच नाही तर काही बांगलादेशी नागरिकसुद्धा रेशनचा लाभ घेत असल्याचे उघडकीस आले होते. दरम्यान याच साऱ्या अपात्र लोकांवर आता केवायसी मोहिमेमुळे मोठी कारवाई करण्यात आली असून आत्तापर्यंत तब्बल १८ लाख रेशन कार्डधारकांची रेशनकार्ड रद्द करण्यात आली आहेत. महत्त्वाची बाब अशी की आगामी काळात आणखी काही अपात्र लोकांची शिधापत्रिका रद्द होणार आहे. दीड कोटी कार्डधारकांची ई-केवायसी प्रलंबित खरंतर, महाराष्ट्रात जवळपास ६ कोटी ८५ लाख रेशन कार्डधारक आहेत.

दरम्यान या एकूण रेशन कार्डधारकांपैकी आतापर्यंत ५.२२ कोटी लोकांनी ई-केवायसी पूर्ण केलेली आहे. दरम्यान आतापर्यंत जितकी केवायसी कम्प्लीट झाली आहे त्यानुसार हे १८ लाख रेशन कार्ड रद्द झाले आहे. आता अजून १ कोटी ६५ लाख रेशन कार्डधारकांची केवायसी प्रलंबित आहे. यामुळे आगामी काळात अजून काही लोकांचे रेशन कार्ड रद्द होणार आहे.

# ज्यांचे हाती पुस्तक तो कधी एकटा पडत नाही- वैभव दूस

## पुस्तके माणसाला कसे जगायचे ते शिकवतात

**अहमदनगर । प्रतिनिधी**

''विज्ञानाच्या वेगवान युगात हाती असलेला मोबाईल व त्यावरील सोशल मीडिया यामधून तरुण पिढी विचलित होत आहे. माध्यमांचे महत्त्व सातत्याने वाढत असले तरी आपली कुवत ,आवड, परिस्थिती या सगळ्यांचा विचार करून सोशल मीडियाच्या ''मोटिवेशनल''च्या नव्हे तर आपला स्वतःचा आतला आवाज ओळखा व कृती करा असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक व वक्ते वैभव दूस यांनी व्यक्त केले. अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित वसंत व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प ''अंत: अस्ति प्रारंभ: या विषयावर गुंफताना ते तरुणाईशी संवाद साधत होते. त्याप्रसंगी मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष किशोर मरकड, वाचनालयाचे अध्यक्ष शिरीष मोडक, उपाध्यक्ष दिलीप पांढरे संचालिका शिल्पा रसाळ, ज्योती कुलकर्णी ,संचालक राहुल तांबोळी, किरण आगरवाल ,कवी चंद्रकांत पालवे, ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल ,कुमारी पल्लवी कुक्कडवाल



उपस्थित होते. वैभव दूस यांनी सद्यस्थितीबद्दल अनेक विषयांना स्पर्श करताना ''आई-वडिलांनी मुलांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्यातील कला, क्रीडा यांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. मुलांना घरात ज्या गोष्टीला प्रतिबंध केला जातो त्याच गोष्टी बाहेर करण्याचा ध्यास उगवत्या भविष्यातील पिढीला नैराश्या येण्याचे कारण बनत आहे. आपल्या आई-वडिलांनी दिलेले संस्कार ,शिकवण, वेळोवेळी दिलेले धोक्याचे इशारे हे भविष्यात आपल्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण असल्याचे सतत वेगवेगळ्या वळणावर कळत जाते. त्यामुळे आई-वडिलांचे महत्त्व हे देवापेक्षा कमी नाही असेही ते म्हणाले. ''पुस्तके माणसाला कसे जगायचे ते शिकवतात.

ज्यांचे हाती पुस्तक आहे तो कधी एकटा पडत नाही. त्याच्या वाट्याला अपयशाला पचवण्याची व परतवून लावण्याची ताकत वाचनातून निर्माण होते. समृद्ध व संस्कारी पिढी घडविण्याचे अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाचे कार्य हे प्रेरणादायी आहे. अशी ''ज्ञानमंदिरे'' गावागावात उभी राहावीत.यातून देशाला कुटुंबाला व स्वतःला चैतन्यमय बनवणाऱ्या पिढ्या निर्माण व्हाव्या.. कारण ही काळाची गरज असल्याचे दूस म्हणाले . या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी करून मान्यवरांचा सन्मान केला. सूत्रसंचालन प्रा .ज्योती कुलकर्णी, परिचय शिल्पा रसाळ तर आभार दिलीप पांढरे यांनी मानले. यावेळी व रसिक नगरकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व संचालक, तसेच ग्रंथपाल अमोल इथापे ,सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल,पल्लवी कुक्कडवाल, संकेत फाटक ,सौ वर्षा जोशी ,संजय गाडेकर ,निखिल ढाकणे , सिकंदर शेख यांचे सहकार्य लाभले..

# समर्पण फक्त शब्दांपुरते सीमित न राहता ते प्रत्येक कृतीतून दिसावे - सतगुरु माता सुदीक्षाजी

## निरंकारी भक्तगणांकडून समर्पण दिवसनिमित्त बाबा हरदेवसिंहजी यांना श्रद्धासुमने अर्पित

**अहमदनगर । प्रतिनिधी**

संत निरंकारी मिशनच्या वतीने समर्पण दिवसाचे औचित्य साधून बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ एक भावपूर्ण वर्चुअल संत समागम आयोजित करण्यात आला. सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता जी यांच्या पावन उपस्थितीत १३ मे रोजी आयोजित केलेल्या या समागमात देशविदेशातून लाखो श्रद्धाळूंनी ऑनलाइन सहभाग घेतला.

समर्पण दिवसाच्या निमित्ताने मंडळाच्या नगर शाखेच्यावतीने मिस्कीनरोड स्थित निरंकारी सत्संग भवन येथे विशेष सत्संग समारोहाचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये शेकडो भाविक भक्तगणांनी भाग घेतला आणि बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचे दिव्य जीवन व शिकवणूकीतून प्रेरणा प्राप्त केली. सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांनी वर्चुअल सत्संगाद्वारे श्रद्धाळू भक्तगणांना संबोधित करताना सांगितले की सतगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचे जीवन क्षणोक्षणी प्रेम, त्याग, सेवा आणि दिव्य शिकवणूकींनी परिपूर्ण होते. असेच भक्तिभावाचे समर्पित जीवन आपलेही व्हावे, समर्पण फक्त शब्दांत न राहता ते आचरणात उतरायला हवे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. सतगुरु माताजी नी स्पष्ट केले समर्पण दिवस ही केवळ एक तारीख नसून, ही एक संधी आहे विचार करण्याची की आपण खरोखरच




आपल्या जीवनाला या शिकवणींशी जोडले आहे का? प्रेम, एकता, मानवता आणि विनम्रता हे आपल्या जीवनात आत्मसात करूनच आपण या दिवसाला खरा अर्थ देऊ शकतो. हाच बाबाजींच्या प्रति खरा आदर आणि समर्पण ठरेल असे शेवटी सांगितले. निश्चितच, बाबा हरदेवसिंहजी यांची दिव्य प्रतिमा प्रत्येक भाविक भक्ताच्या अंत:करणात एक अमिट आठवण म्हणून कायम राहील. त्यांच्या अमूल्य उपकारांसाठी संपूर्ण निरंकारी परिवार त्यांचा सदैव कृतज्ञ राहील. आज सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज, बाबाजींची शिकवण पुढे घेऊन जात असून ब्रह्मज्ञानाच्या दिव्य प्रकाशाने संपूर्ण मानवतेला उजळवत आहेत.

# ओम साहेबराव दंडवते याची महाराष्ट्र संघासाठी निवड

## महाराष्ट्राच्या संघाचे करणार प्रतिनिधित्व

**अहमदनगर । प्रतिनिधी**

दीव-दमण येथे १९ मे पासून सुरु होणाऱ्या खेलो इंडिया बीच गेम्स २०२५ स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र बीच फुटबॉल संघात अहमदनगर जिल्हा फ ुटबॉल संघटनेचा खेळाडू ओम साहेबराव दंडवते याची निवड झाली आहे.

अलिबाग (जि. रायगड) येथे ७ ते ९ मे दरम्यान पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य बीच फुटबॉल निवड चाचणीमधून खेलो इंडिया स्पर्धेसाठी १२ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या खेळाडूंचे प्रशिक्षण शिबिर मुंबई येथे १३ तारखेपासून



सुरु झाले असून, ते १८ मे पर्यंत चालणार आहे.

ओम दंडवते याने अहमदनगर जिल्हा फ ुटबॉल संघटनेद्वारे आयोजित केलेल्या जिल्हा फुटबॉल लीगमध्ये कराळे क्लब हाऊस संघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. तसेच वरिष्ठ राज्य अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेमध्ये अहिल्यानगर जिल्हा संघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. दंडवते याची महाराष्ट्राच्या संघात निवड झाल्याबद्दल अहमदनगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, अमरजितसिंग शाही, जोगासिंग मिन्हास, सचिव रोनप फर्नांडिस, सह-सचिव प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ, राजू पाटोळे, खजिनदार रिशपालसिंग परमार व इतर सर्व सभासदांनी अभिनंदन केले व त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# समाजकल्याण विभागाचा निधी इतर खात्यात वर्ग करू नये- बाळासाहेब केदारे

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

समाज कल्याण विभागाचा निधी हा मागासवर्गीय समाजाच्या विविध योजना राबवण्यासाठी व मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण विकासासाठी राखीव ठेवलेला असतो हा निधी इतर खात्यात वर्ग न करता हा संपूर्ण निधी विविध योजनात वाटप करण्यात यावा अशया मागणी साठी राष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार व माधवराव गायकवाड, शांताराम कारंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना



निवेदन देताना जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे, राज्य कार्यकारणी सदस्य कैलास गांगर्डे, उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष राजेंद्र बुंदेले, राज्य कार्यकारणी सदस्य शोभा कानडे, ज्ञानेश्वर मैसमाळे, गणेश गोरे आदी उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की, मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण विकासासाठी राखीव ठेवलेला निधी हा देखील पूर्णपणे नसतो या वर्षातील बराच निधी गेल्या महिन्यापासून इतर योजनेसाठी इतर विभागाकडे वळवण्यात आलेला आहे. समाज कल्याण मंत्री यांच्या प्रसारमाध्यमातील वक्तव्यावरून निदर्शनास आले आहे. त्यामुळे समाज कल्याण खात्यात अंतर्गत येणाऱ्या सर्व योजनेवर त्यांचा विपरीत परिणाम होणार आहे तसेच समाज कल्याण मार्फत राबवण्यात येणाऱ्या सर्व योजनेवर त्याचा दुरुपयोगी परिणाम होणार असून समाज कल्याण खात्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शिष्यवृत्ती, परदेशी शिकणाऱ्या मुलांची बार्टीच्या मार्फत देण्यात येणारी शिष्यवृत्ती, आश्रम शाळा निधी, विद्यार्थी प्रशिक्षण निधी तसेच मागासवर्गीयांचा विविध कर्ज योजना इत्यादींवर व मागासवर्गीय विभागाला म्हणजेच समाज कल्याण खात्याला निधी योग्य प्रमाणात दिला जात नाही व तोही वेळेवर मिळत नाही तरी मागासवर्गीय समाजावर होणारा अन्याय दूर करून निधीचे वितरण पूर्ववत समाज कल्याण विभागाला करण्यात यावे व अशा प्रकारे समाज कल्याण खात्याचा निधी इतर खात्यात वळवण्याच्या घटना पुढे होऊ न देता याची दक्षता घेण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



# भाजपा सावेडी मंडलातर्फे दहावीतील विद्यार्थ्यांचा सत्कार

**अहमदनगर । प्रतिनिधी**

दहावी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होणे हा एक आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा पार करणे आहे. यानंतर खरे तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्याला कलाटणी मिळत असते, यातूनच विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा मिळते असे प्रतिपादन भाजपा सावेडी मंडलाचे अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे यांनी केले.

ते प्रोफेसर कॉलनी चौक येथे आयोजित दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी बोलत होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून पेढे भरविण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सावेडी मंडलाच्या वतीने करण्यात आला.

यावेळी भाजपाचे अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर काळे, नितीन शेलार, बाळासाहेब गायकवाड, वैभव झोटिंग, दत्ता गाडळकर, सुमित बटुळे, आकाश सोनवणे, सुमित कुरुंद , लखन शिंदे, जीवन चाबुकस्वार, मनोज भगत आदी कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. पाउलबुधे विद्यालयाचा दहावी निकाल ९४ टक्के

**अहमदनगर । विजय मते**

अहिल्यानगर येथील वसंत टेकडी जवळील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ. ना.ज पाऊलबुधे माध्यमिक विद्यालयाचा एसएससी २०२४-२५ चा निकाल ९४% निकाल लागला आहे. दरवर्षीप्रमाणे उत्कृष्ट निकालाची परंपरा विद्यालयाने कायम ठेवली आहे. मार्च २०२४-२५ परीक्षेत ११८ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. फक्त सात विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयात प्रेम गर्जे ९३.८०% गुण मिळवून प्रथम आला तर आदित्य रासकर ९२.६०% गुण मिळवून दुसरा तर साईराज पवार हा ९१.४०% गुण मिळवून तिसरा आला आहे. या तिन्ही विद्यार्थ्यांसह सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे,उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल,सचिव रामकिसन देशमुख, सर्व संचालक, माजी प्राचार्य भरत बिडवे, मुख्याध्यापिका विजया नवले, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**

परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

८८८८३४७४११

निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी

फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स

राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.

(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०

ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

जगदंबा टी सेंटर

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर

शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे

97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



# जवाहर माध्यमिक विद्यालयात गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा संपन्न

**नेवासा । रावसाहेब राशिनकर**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चांदा येथे शाळा व्यवस्थापन समिति अध्यक्ष कैलास दहातोंडे यांच्या अध्यक्षतेखाली एसएससी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा व ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षेत जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत विशेष प्राविण्यासह क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

प्रणव सचिन महाजन या विद्यार्थ्याने ९४.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक धुमाळ सायली गणेश ९३.६० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर धुमाळ स्वरूपा प्रकाश हिने ९२.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक ठोंबरे श्रुती भाऊसाहेब हिने ८८.८० टक्के गुण मिळवून चतुर्थ क्रमांक व जावळे रोहित रमेश याने ८७.४० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळवणाऱ्या तसेच ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षेत जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत विशेष प्राविण्यासह स्थान मिळवणाऱ्या आराध्या अनिल दहातोंडे व वैष्णवी सोमनाथ दहातोंडे या सर्व विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षक कारले पी एम, शेंडगे एस आर, भोजने आर एन, शेंडगे आर बी, शेटे जे एस,लोखंडे एम एम, म्हसे एन के, मरडे एस एस, कांबळे बी के,पठाण एफ एम ,स्वाती दळवी यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे आयोजित राज्यस्तरीय शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याबद्दल प्रा.दिलीप ससे,प्रा. कृष्णा शेंडे, श्रीमती स्वाती दळवी, श्रीमती रुख्मिणी सोनवणे, जालिंदर शेटे, राजेश शेंडगे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रम प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य हरीभाऊ जावळे,उपप्राचार्य रघुनाथ भोजने, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष बाबासाहेब जावळे, शहाजी धुमाळ,बंडू दहातोंडे चेअरमन, सुभाष शिंदे, लक्ष्मीकांत कर्डिले, रावसाहेब भालके, सतिष गाढवे, पत्रकार देविदास चौरे, पोलिस पाटील कैलास अभिनव, अनिल शिंदे, सोमनाथ दहातोंडे,सचिन महाजन ,संदीप शेंडगे ,ग्रंथपाल सी. एन.घुगरकर यांसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी राजू कुसळकर उपस्थित होते.

सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती स्वाती दळवी व प्रवीण कार्ले यांनी सूत्रसंचालन केले व प्रसिध्दी विभाग प्रमुख प्रा.रावसाहेब राशिनकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# महिंद्रकर व लोहकणे सीबीएसई परीक्षेत ९९ टक्के गुण मिळवुन प्रथम

## संजीवनीने जपली १०० टक्के निकालाची परंपरा









**कोपरगाव । किसन पवार**

केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रवारी २०२५ मध्ये घेतलेल्या इ. १० वीच्या परीक्षांचे निकाल जाहिर केले असुन यात संजीवनी अकॅडमीच्या प्रतिभावंतानी शाळेची १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. यात श्रेय रूपेश महिंद्रकर याने व ईश्वरी निलेश लोहकणे या दोघांनीही ९९ टक्के गुण मिळवुन आपल्या प्रतिभा संपन्नतेचे दर्शन घडवत स्कूलमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तिर्ण होण्याचा बहुमान पटकाविला. श्रेयन संतोष भोर हा ९७. २० टक्के गुण मिळवुन दुसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला. रियांश जयप्रकाश कारवा याने ९७ टक्के गुण मिळवुन तिसरा क्रमांक मिळविला. सिध्दांत विलास महिरे याने ९६. ४० टक्के मिळवुन चौथ्या क्रमांकावर शिक्कामोर्तब केले. एकुण ९७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. उत्कृष्ट निकालाने संजीवनी अकॅडमीने आपला शैक्षणिक दर्जा पुन्हा एकदा सिध्द केला आहे, असे संजीवनी अकॅडमीने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. पत्रकात पुढे म्हटले आहे की श्वेता विजय मोरे व आर्या सुजितकुमार सोनवणे यांनी प्रत्येकी ९६. २० टक्के गुण मिळविले. तसेच संस्कार संतोष बेलदार याने ९५. ८०, निशिगंधा शांताराम वाबळे हिने ९५. ४०, आदित्य धर्मराज भामरे व पार्थ दत्तात्रय रहाणे यांनी प्रत्येकी ९५. २० टक्के गुण मिळविले. १२ विद्यार्थ्यांनी ९५ टक्यांपेक्षा अधिक गुण मिळविले. ९० टक्यांच्या पेक्षा अधिक ३४ व ८० टक्यांपेक्षा अधिक ६६ विद्यार्थ्यांनी गुण मिळविले. मराठी मध्ये ६ व संस्कृत या विषयामध्ये २ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळविले. इंग्रजी विषयात ४८ विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी व संस्कृत हे विषय मिळून ५६, गणित विषयात १०, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विषयात ७८, सायन्स विषयात १५ व सोशल स्टडीज विषयात २५ विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९० पेक्षा अधिक गुण मिळविले. संजीवनी अकॅडमीचे विद्यार्थ्यांनी विविध खेळ, सांस्कृतिक, विज्ञान प्रदर्शन , तांत्रिक स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, अशा प्रत्येक बाबतीत बक्षिसे मिळवुन आपली आघाडी सिध्द केली आहे. आता शैक्षणिक गुणवत्तेमध्ये १०० टक्के निकाल देवुन स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे, असे पत्रकात शेवटी म्हटले आहे. संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक, एक्झिक्युटिव्ह प्रिंसिपाल रेखा पाटील, प्रिंसिपाल शैला डुबे , सर्व शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.







# श्रीराम विद्यालयाचा दहावी निकाल ९३.२० टक्के

**नगर तालुका । प्रतिनिधी**

तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील श्रीराम विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९३. २० टक्के लागला असून विद्यालयात नम्रता शरद लहारे हिने ९५. २० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला.

द्वितीय क्रमांक वेदांत कृष्णा सत्रे ९५ टक्के व तृतीय क्रमांक भक्ती भरत झिने ९४. ८० टक्के मिळवून पटकावला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री गोरक्षनाथ विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, प्राचार्य संभाजी पवार, ग्रामपंचायत सरपंच राधिका प्रभुणे, प्रा. देवराम शिंदे व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# सावतामाळी पाणी वापर संस्थेची सभा खेळीमेळीत

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्री सावतामाळी पाणी वापर संस्था क्रमांक ४ श्रीगोंदा ची संचालक मंडळाची सभा रविवार ता. ११मे २०२५ रोजी खंडोबा मंदिर येथे संस्थेचे व्हा.चेअरमन बाळासाहेब खेतमाळीस यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. संस्थेचे नऊ पैकी आठ संचालक उपस्थित असल्याने कोरम पुर्ण झाल्याने सभेच्या कामकाज सुरू करुन संस्थेचे सचिव शरद डाके यांनी प्रथम मागील सभेचे इतिवृत्ताचे वाचन केले त्यास सर्व सहमतीने त्यास मंजुर करण्यात आले. यावेळी सभेपुढील विषयांवर साधक बाधक चर्चा करुन ज्या शेतकऱ्यांनी चारीवरुन केलेल्या पाइपलाइनमळे खराब झालेल्या चारीच्या साईड पटटयांवर मुरुम टाकुन घेणे, चारीवर ठाकलेल्या नळ्यांवर बांधकाम करणे, संस्थेच्या झालेल्या खर्चास मान्यता देणे, सभासदाकडील थकबाकी ३०जून अखेर जमा करणे व संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत संपत असल्याने २०जुलै रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा घेऊन नवीन कार्यकारिणीची सभासदांबरोबर चर्चा करुन बिनविरोध निवड करणे याविषयावर चर्चा करुन सर्वानुमते सर्व ठराव मंजूर करण्यात आले. वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २०जुलै रोजी खंडोबा मंदिर येथे होणाऱ्या सभेत थकबाकी असणाऱ्या सभासदास भाग घेता येणार नाही.तसेच संस्थेस किमान ३००० रु पेक्षा जास्त उत्पन्न देणाऱ्या सभासदासच कार्यकारिणीत संचालक होण्यास सहभागी होता येईल असा ठराव करण्यात आला आहे. तरी सर्व सभासदांनी ३०जून पर्यंत आपली थकबाकी जमा करुन होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित रहावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.



# सोनईतील संस्कृती हापसेचा पुण्यात डंका

**नेवासा । विजय खंडागळे**

आईचे मेंदूवर शस्त्रक्रिया, एकाच जागी पडून असल्याने कोणाचेही लक्ष लागत नव्हते, त्यात सोनईची मध्यम कुटुंबात वावरत असलेली संस्कृती दत्तात्रय हापसे हिने पुणे येथील आगरकर हायस्कूल मध्ये दहावीच्या परीक्षेत ९०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला.

ग्रामीण भागातील या मुलीने पुण्यात २ रा क्रमांक पटकावला आहे. या कन्येचा यशाचा डंका सोनई परिसरात होत आहे.

सोनई परिसरातील दत्तनगर भागात राहणारे संस्कृती हापसे, आई प्रचंड आजारी असल्याने घरची परिस्थिती अतिशय नाजूक, तिने आपल्या आई-वडिलांची इच्छा स्वप्नपूर्तीसाठी पुण्यात शिक्षण घेत आहे. मला आई-वडिलांच्या खडतर परिस्थितीने यशाचा मार्ग दाखवला आणि मला आयटी इंजिनिअर होण्याचे माझं स्वप्न आहे असे संस्कृतीने सांगितले. माझ्या या यशात आई ज्योती हापसे, वडील दत्तात्रय हापसे, शिक्षक पोतदार ,कोष्टी यांचे मार्गदर्शन लाभले.संस्कृती हीचा सन्मान जुना वांबोरी निवासस्थानी हभप श्रद्धाताई दरंदले, सुनिता दरंदले ,विलास पटारे, छाया पटारे, दीपक पटारे, रेणुका पटारे ,शिवकन्या हापसे, शिवरुद्र पटारे पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. ती ह्या आनंदाने भारावून गेली होती.

# एकनाथ मडके यांचे वृध्दापकाळाने निधन



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

तालुक्यातील गदेवाडी येथील मडके कुटुंबांचे सदस्य कै. एकनाथ सूर्यभान मडके यांचे ता. १३ मे रोजी निधन झाले. त्यांचे वय ७८ वर्ष होते. त्यांचा दशक्रिया विधी २२ मे रोजी सकाळी ९ वाजता नाथ मंदिरामागे पैठण येथे होणार आहे. तसेच तेरावा विधी २५ मे रोजी गदेवाडी येथे होणार आहे. दशक्रिया विधिनिम्मित हभप.वैभव महाराज माळवदे यांचा प्रवचनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यांच्या पश्चात २ मुले १ मुलगी भाऊ ४ पुतणे असा परिवार आहे.



# दिव्यांगांसाठी नोकरी,व्यवसाय मार्गदर्शन मेळावा संपन्न

**राहुरी । दत्तात्रय जोगदंड**

राहुरी येथे यूथ फॉर जॉब, अनामप्रेम, दिव्यांग शक्ती सेवा संस्था, राहुरी तसेच प्रहार दिव्यांग संघटना, उत्तर अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने ''चला नोकरी मिळवून देऊया दिव्यांगांना चला व्यावसायिक बनवूया दिव्यांगांना'' या उपक्रमांतर्गत दिव्यांग बांधवांसाठी भव्य नोकरी मेळावा व व्यवसाय कर्ज मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याला दिव्यांग बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण २२ विद्यार्थ्यांची निवड प्रशिक्षण व व्यवसाय कर्जासाठी करण्यात आली असून प्रशिक्षणानंतर स्थानिक कंपन्यांमध्ये नोकरी तसेच कर्जाची सुविधा मिळवून देण्यात येणार आहे. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रहार दिव्यांग संघटनेचे सल्लागार सलीमभाई शेख होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे यांनी केले. प्रमुख उपस्थिती पोलीस निरीक्षक लबडे यांची होती. यूथ फॉर जॉब संस्थेचे समन्वयक विजय सातदिवे यांनी नोकरी व प्रशिक्षण यासंदर्भात मार्गदर्शन केले, तर अनामप्रेम संस्थेचे एक्झिक्यूटिव्ह तुळशीराम जाधव यांनी व्यवसाय कर्जाविषयी माहिती दिली. यावेळी तालुकाध्यक्ष योगेश लबडे, तालुका संपर्कप्रमुख रवींद्र भुजाडी, शहर उपाध्यक्ष जालिंदर भोसले, नानासाहेब खपके, संतोष धुमाळ, पाराजी भोसले आणि प्रविण नवले उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांचे आभार प्रहार दिव्यांग संघटनेचे संपर्कप्रमुख रवींद्र भुजाडी यांनी मानले.

# विजय हनुमान मंदिरास गोवत्स राधाकृष्ण महाराज यांची भेट

## धार्मिक वारसा जतनाचे केले आवाहन

**पाथर्डी । नितीन गटाणी**

पाथर्डी गाव पातळीवरील प्राचीन व ऐतिहासिक धर्मस्थळे ही त्या परिसराची प्रेरणास्थळे असतात. अशा सर्व स्थळांचा विकास,देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी गावकऱ्यांनी श्रद्धायुक्त भावनेने उचलल्यास पुढील पिढ्यांना धार्मिकतेची गोडी लागून गावाविषयी आपलेपणाची भावना वाढणार आहे. असे मत भागवत कथाकार गोवत्स राधाकृष्ण महाराज ( जोधपुर) यांनी व्यक्त केले. शहराचे ग्रामदैवत विजय हनुमान दक्षिण मुखी मारुती मंदिर येथे आज त्यांनी भेट दिली. दक्षिणमुखी मारुती मंदिर येथे गावचा सार्वजनिक पोळा भरतो यामुळे पोळा मारुती मंदिर म्हणूनही ओळखले जाते. या मंदिराला सुमारे चारशे वर्षांचा इतिहास आहे. गावातील प्रत्येक शुभ कार्य या स्थानाला साक्षी ठेवून म्हणजेच निमंत्रण देत केले जाते. अत्यंत जागृत मंदिर असल्याने भाविकांची येथे सतत वर्दळ असते. लोकसहभागातून या मंदिराचा अत्यंत भव्य अशा स्वरूपात जीर्णोद्धार सुरू असून हनुमान मंदिराच्या विश्वस्त मंडळाने महाराजांना भेटीचे निमंत्रण दिले होते.

यावेळी सेवकांबरोबर चर्चा करताना राधाकृष्ण महाराज म्हणाले, येथील मंदिरामध्ये अत्यंत सकारात्मक ऊर्जा असून दैवी अधिष्ठानाची लगेचच प्रचिती मिळते. सद्य परिस्थितीमध्ये हनुमंताची उपासना शीघ्र फलदायी,रक्षण करणारी व कल्याणकारी समजली जाते. बल,बुद्धी,विद्या,सेवा,नम्रता अशा विविध गुणांचा समुच्चय हनुमंताच्या ठाई असून धर्माचे अधिष्ठान हाती घेतलेल्या प्रत्येक कार्यात यश देणारी आहे. नव्या पिढीला धर्मकार्याकडे व धर्म रक्षणाकडे आकर्षित करून पुन्हा



एकदा रामराज्य प्रस्थापित करण्यासाठी समाजातील प्रत्येक श्रद्धाळू घटकाला हनुमंताची भूमिका पार पाडावी लागेल. शहरातील तरुणांनी शहराच्या वैभवात भर घातली जाईल,असे भव्य दिव्य मंदिराचे काम अत्यंत परिश्रमपूर्वक हाती घेतले आहे.या मंदिराचे कार्य लवकरात लवकर पूर्ण होऊन पंचक्रोशीतील सर्व भाविकांना व शहरवासी यांना येथील सेवा दीर्घकाळ घडावी यासाठी प्रत्येकाने प्रभू कार्यासाठी वेळ देणे आवश्यक आहे.पाथर्डी शहराचा आध्यात्मिक धार्मिक व ऐतिहासिक इतिहास अत्यंत उज्वल असून देवी देवतांचा तालुका संत महंतांचा अशी तालुक्याची ओळख सर्वत्र आहे.गावांमधील मंदिरांची अवस्था कशी आहे,तेथे येणाऱ्या भाविकांमध्ये सेवाभाव कसा आहे,तेथे चालणाऱ्या उपक्रमांमध्ये किती जणांचा सहभाग असतो,यावरून गावाची धार्मिक उंची लोकांपुढे येते.जीवनामध्ये सर्व गोष्टी नश्वर असून दोन्ही हातांनी विवेक बुद्धी स्थिर ठेवून केलेली सत्कर्म अंतिमतः कल्याणकारी ठरतात.विविध हिंदुत्ववादी संघटना,मंदिर विश्वस्त समिती,मंदिर जीर्णोद्धार समिती, विविध मंडळ व समाजाचे कार्यकर्ते भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोककवी, लोकशाहीर वामनदादा कर्डक

महाराष्ट्राचे लोककवी, शाहीर, आंबेडकरी चळवळीचे बुलंद कार्यकर्ते आणि समाज प्रबोधनकार वामन तबाजी कर्डक यांची काल म्हणजे १५ मे रोजी २१ वी पुण्यतिथी होती. त्यांच्या २१ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा हा विशेष लेख.

वामनदादा कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशपंडी या छोट्याशा खेड्यात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव तबाजी तर आईचे नाव सईबाई असे होते. त्यांना एक मोठा भाऊ आणि एक धाकटी बहीण होती. वामनदादा यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना शिक्षण घेता आले नाही. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने उदरनिर्वाहासाठी दादा मिळेल ती कामे करू लागले. जत्रा यात्रांमधून कुस्ती खेळू लागले त्यातून जे पैसे मिळत त्यातून ते घरखर्च चालवू लागले. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांचे लग्न झाले पण त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य लाभले नाही. त्यांच्या पत्नीचे अकाली निधन झाले पुढे मुलाचेही निधन झाले. इतके मोठे दुःख उराशी बाळगून त्यांनी मुंबई गाठली. मुंबईत त्यांनी गिरणी कामगार म्हणून काम केले. बीडीडी चाळीत त्यांचे वास्तव्य असे तिथेच त्यांची समता सैनिक दल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांशी ओळख झाली. समता सैनिक दलातर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेचे आयोजन करण्यात त्यांचा पुढाकार असायचा. वामनदादांना लहानपणापासून गायनाची आवड होती. त्यांना मिळालेली प्रतिभा ही जन्मदत्त देणगी होती. लहानपणापासून गायनाची आवड असलेल्या वामनदादांकडे लेखणी, वाणी आणि संगीत यांचा त्रिवेणी संगम होता. एक दिवस फावल्या वेळेत ते राणीच्या बागेत बसले असताना त्यांनी एका हिंदी चित्रपट गीताचे विडंबन केले. ते गीत त्यांनी राणीच्या बागेतील गर्दीपुढे म्हटले. त्यांचे हे विडंबन गीत उपस्थित लोकांना खूप आवडले. त्यांचा आवाज आणि गाण्याचे बोल लोकांना आवडू लागले. पुढे ते आंबेडकरी जलशांमध्ये गाऊ लागले. विशेषतः ज्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण असे त्याठिकाणी बाबासाहेबांच्या भाषणाआधी वामनदादांचे गाणे होत असे. बाबासाहेबांनी त्यांच्या गाण्याची स्तुती अनेकवेळा आपल्या भाषणांमधून केली आहे. बाबासाहेब म्हणत माझ्या दहा भाषणांचं काम शाहिरांचं एक गाणे करते. वामनदादांचे बहुतांश गीते हे लोकगीते आहेत. वामनदादांची गीते म्हणजे कोंडलेल्या मनाचा हुंकार. वामन दादांच्या गीतांचा केंद्रबिंदू हा मानव होता म्हणूनच वामनदादा म्हणतात मानवा इथे मी तुझे गीत गावे....



तुझे गीत व्हावे मानवता. आंबेडकर भक्ती, दलित, शोषित, स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्था यावर वामन दादांनी आपल्या गीतातून प्रबोधन केले. दादांनी आपल्या गीतातून हुंडाबळी, ऊसतोड कामगार, पर्यावरण, कामगार, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळ यावरही भाष्य केले. त्यांच्या गीतांचे प्रेरणास्थान डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच होते. वामन दादांनी स्वतःला भीमकार्यात वाहून घेतले. दादांनी आपल्या असंख्य लोकगीतांतून लोकांना भुरळ घातली. म्हणूनच ते लोककवी झाले. दादांनी आयुष्यभर आंबेडकरी विचारांची पताका आपल्या खांद्यावर खंबीरपणे वाहिली. आपल्या तेजस्वी लेखणीने आणि कणखर वाणीने फुले, शाहू, आंबेडकर घराघरांत पोहचवणाऱ्या या महाकवीचे १५ मे २००४ रोजी निधन झाले. लोककवी वामन दादा कर्डक यांना २१ व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# खासदार गोविंदराव आदिक शिक्षण संस्थेच्या निकालाची परंपरा यंदाही कायम

## ३ शाळांचा १०० टक्के निकाल ; अभिनंदनाचा वर्षाव

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने २०२५ मध्ये घेतलेल्या इ. १० वी च्या परिक्षेत खासदार गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था संचलित तीन शाळेचे निकाल १०० टक्के तर उर्वरीत नऊ शाळेचे निकाल ७५ टक्के च्यावर लागला आहे. या संस्थेचे कार्यकारी विश्वस्त अविनाश आदिक व माजी नगराध्यक्ष अनुराधाताई आदिक यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेने यशस्वी निकालाची परंपरा कायम राखली आहे. खासदार गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल माळवाडगाव इयता १० वी मार्च २०२५ चा निकाल १०० टक्केलागला असून प्रथम क्रमांक आसने मयुरी जालिंदर ९५.६० टक्के द्वितीय दळे सानवी अजिनाथ – ९३.०० तृतीय – आसने हर्षल अनिल– ९२.००%. यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर नाईक यांच्यासह शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले. जानकीबाई वामनराव आदिक माध्यमिक विद्यालय खानापूर इयता १० वी मार्च २०२५ चा निकाल ७९.४१ टक्केलागला असून प्रथम क्रमाक आदिक धनश्री दिगंबर ८८.६०टक्केव्दितीय जाधव कीर्ती रामनाथ ८७.४०%,तृतीय आदिक आदिती महेश ७८.८०टक्केयशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक गवारे बाबासाहेब यांच्यासह शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले.

कै. रघुनाथ कृष्णाजी पा. औताडे विद्यालय माळेवाडी माळवाडगाव इयता १० वी मार्च २०२५ चा निकाल ९३.७५ टक्केलागला असून प्रथम कु.आव्हाड अभिजात नारायण ९०.०० %,व्दितीय कु. ठाकरे वैष्णवी बाबासाहेब ८९.००%. तृतीय धानापुणे सृष्टी सुनील ८७.२०टक्के यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक तऱ्हाळ शामराव यांच्यासह शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले.

खा. गोविंदराव आदिक उर्दू हायस्कूल श्रीरामपूर इयता १० वी मार्च २०२५ चा निकाल ९६.६६टक्केलागला असून पहिला क्रमांक– शाह साजेदाकेसर मुजफ्फर ८७.४०टक्के दुसरा क्रमांक शेख मनतशा फारुक ८१.००टक्के,तिसरा क्रमांक मोमीन तहेश मोहम्मद अतारहसन ८०.६०टक्के यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक महेजबिन खान मॅडम यांच्यासह शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले. न्यू इंग्लिश स्कूल निमगावखैरी इयता १० वी मार्च २०२५ चा निकाल ९५.२३ टक्केलागला असून प्रथम चिरंजीव मुळे समर्थ बाळासाहेब–९२.४०टक्केव्दितीय कुमारी गाणार ज्ञानेश्वरी अरुण –९०.००टक्के,तृतीय कु जाधव ईश्वरी भिकाजी –८६.६०टक्के यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक शिंदे शंकर विठ्ठल यांच्यासह शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले. गोरक्षनाथ माध्यमिक विद्यालय खोकर इयता १० वी मार्च २०२५ चा निकाल १००टक्केटक्केलागला असून प्रथम क्रमांक भणगे वैष्णवी रवींद्र ८५.२० %, द्वितीय क्रमांक चव्हाण गायत्री मच्छिंद्र ७७.२० %,तृतीय क्रमांक शंकर सिद्धी अविनाश ७६.८०%, यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापिका मंदाकिनी खाजेकर यांच्यासह शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले. बेलापूर कंपनी हायस्कूल हरेगाव इयता १० वी मार्च २०२५ चा निकाल ८५.७१टक्केलागला असून शाळेत प्रथम क्रमांक जाधव रेणुका किशोर ८१.६०टक्केसाळवे साक्षी लक्ष्मण ८१.२०टक्के,तृतीय क्रमांक तांदळे श्रद्धा योगेश ८०.६०टक्केयशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक राजूसाहेब झिने यांच्यासह शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले. न्यू इंग्लिश स्कूल कारेगाव इयता १० वी मार्च २०२५ चा निकाल ९३.३३टक्केलागला असून प्रथम सोमवंशी अथर्व किशोर ८६.८०%, व्दितीय पटारे गायत्री संदीप ८४.८०,तृतीय क्रमाक हळनोर भक्ती नवनाथ ८४.४० टक्के यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक मोरे पंडितराव यांच्यासह शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले. न्यू इंग्लिश स्कूल शिरसगाव इयता १० वी मार्च २०२५ चा निकाल ८५.००टक्केलागला असून प्रथम पवार ईश्वरी दत्तात्रय ८८.६०टक्केव्दितीय वायाल श्वेता दीपक ८३.४०%, तृतीय गायकवाड तनिष्का राजेंद्र ८२.६०टक्केयशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक काळे सुभाष यांच्यासह शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले. न्यू इंग्लिश स्कूल उक्कलगाव इयता १० वी मार्च २०२५ चा निकाल ८९.६१ लागला असून प्रथम क्रमांक थोरात श्रद्धा प्रवीण ९५.२०%, द्वितीय थोरात रिद्धी सतीश ९४.६०%,तृतीय क्रमांक थोरात समृद्धी चंद्रभान ९४.२०टक्केयशस्वी विद्यार्थना शाळेचे मुख्याध्यापक उत्तम गोरे यांच्यासह शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले. न्यू इंग्लिश स्कूल मातापूर इयता १० वी मार्च २०२५ चा निकाल १००.०० टक्केलागला असून प्रथम– गायके साधना सारंगधर–८८.००%,द्वितीय– काकडे प्रतीक्षा रमेश–८७.४०%, तृतीय– गायके आराधना सारंगधर– ८६.८०टक्के .यशस्वी विद्यार्थना शाळेचे मुख्याध्यापक थोरात विजय यांच्यासह शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले. श्रीमती जानकीबाई आदिक विद्यालय अशोकनगर इयता १० वी मार्च २०२५ चा निकाल ७२.७२ टक्केलागला असून प्रथम– प्राची दीपक भोसले ८८.८०%,द्वितीय– समीक्षा रवींद्र जाधव–७६.४०%, तृतीय– गायकवाड पूजा अनिल– ७०.८०टक्केयशस्वी विद्यार्थना शाळेचे मुख्याध्यापिका आवटी अरुंधती यांच्यासह शिक्षकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या चेअरमन पुष्पलता गोविंदरावजी आदिक ,अध्यक्ष डॉ. बबनराव आदिक, कार्यकारी विश्वस्त अविनाश आदिक,माजी विश्वस्त साईबाबा संस्थान शिर्डी , माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक, सह सेक्रटरी जयंत चौधरी, हंसराज आदिक,नितीन पवार, सुनिल थोरात, सर्व संस्था सदस्य तसेच शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# छत्रपती संभाजी महाराज समाजरत्न पुरस्कार श्रीनिवास बोज्जा यांना प्रदान

**नगर तालुका । प्रतिनिधी**

तालुक्यातील निमगाव वाघा येथील स्व.पै.किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने यंदाचा समाजरत्न पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांना खा. निलेश लंके यांच्या हस्ते देण्यात आला.

स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, अध्यात्मिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना राज्यस्तरीय छत्रपती संभाजी महाराज पुरस्कार देण्यात येतो. यावर्षीचा पुरस्कार सामाजिक



कार्यकर्ते, फटाका व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष, माजी नगरसेवक श्रीनिवास बोज्जा यांना देण्यात आला. संस्थाध्यक्ष पै.नाना किसन डोंगरे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते तर सूत्रसंचालन अमोल बागुल यांनी केले.



# श्रीगोंदा येथे सिंदुर रक्तदान शिबीराचे आयोजन

## शंभुराजे प्रतिष्ठान व शहीद जवान स्मारक समितीचा उपक्रम

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे ३६८ व्या जयंती निमित्ताने शंभुराजे सामाजिक प्रतिष्ठान व शहीद जवान स्मारक समितीने श्रीगोंदा येथे सिंदुर रक्तदान शिबीरात ७० जणांनी रक्तदान केले व श्री छत्रपती संभाजी महाराज, सिंदुर ऑपरेशन मधील शहीद जवान व पहलगाम भ्याड हल्ल्यात ठार झालेल्या नागरिकांना मानवंदना दिली. रक्तदान शिबीर व वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन माजी नगराध्यक्षा शुभांगी पोटे व सतिश बोरा यांच्या हस्ते करण्यात आले. अग्नीपंख फौंडेशनने मदन बिसुकर्मा या नेपाळी रखवालदारास औषधोपचारासाठी दहा हजाराची मदत केली. श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे जीवनावर २० बाल व्याख्यात्यांनी चित्त थरारक विचारशब्द वर्षाव करुन वक्तृत्व स्पर्धा गाजविली या स्पर्धेत प्रथम क्रमांक अंजली आढाव (कोरेगव्हाण) द्वितीय क्रमांक देवेंद्र ओव्हळ (प्रिपी कोंलदर) तृतीय क्रमांक उत्कर्ष थोरात (काष्टी) यांनी पटकावला. बक्षिस वितरण परिक्रमाच्या अध्यक्षा प्रतिभा पाचपुते सनराईजच्या प्राचार्य राजेश्री शिंदे जिल्हा सैनिक संघटनेचे संदीप सांगळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रशिक्षक म्हणून दत्ता जगताप प्रकाश चव्हाण विठठल बरबडे यांनी काम पाहिले. प्रतिभा पाचपुते म्हणाल्या कि शिवशंभु सामाजिक प्रतिष्ठानने श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे जयंती निमित्ताने सिंदुर रक्तदान व वक्तृत्व स्पर्धेचा चांगला उपक्रम राबविला आहे. शुभांगी पोटे म्हणाल्या की श्रीगोंद्यात सामाजिक जाणिवेतून वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत हे कौतुकास्पद आहे. यावेळी डॉ विक्रम भोसले अजीत काकडे एम डी शिंदे सुधीर खेडकर सतिश मखरे शहाजी खेतमाळीस बाळासाहेब खामकर राहुल कोठारे अभिषेक दंडनाईक अमोल दंडनाईक ॲड संपत विधाते किसन वऱ्हाडे विजया लंके रेश्मा रमेश दरेकर चंद्रकात कोंथिबीरे रेश्मा डांगे आयुब तांबोळी उपस्थित होते शिबीर यशस्वी होणेसाठी शंभुराजे सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवनाथ खामकर नवनाथ दरेकर संतोष जाधव विकी शिवले गोपाळराव डांगे यांनी व बारामती येथील अहिल्याबाई होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सेवक व माजी सैनिकांनी विशेष परिश्रम घेतले.

# लिंगायत संघर्ष समिती महिला आघाडी तालुकाध्यक्षपदी फुलशेटे यांची निवड



**पाथर्डी । नितीन गटाणी**

संपुर्ण महाराष्ट्रातील लिंगायत बांधवांचे शीर्ष नेतृत्व करणाऱ्या लिंगायत संघर्ष समितीच्या महिला आघाडी तालुकाध्यक्ष पदी रेणुका फुलशेटे यांची निवड करण्यात आली. लिंगायत संघर्ष समितीचे राज्य समन्वयक काकासाहेब कोयटे, प्रदेश अध्यक्ष सुनिल रुकारी, कार्याध्यक्ष सरला पाटील यांचे संमतीने अहिल्यानगर चे जिल्हाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले.

ज्या महात्मा बसवेश्वर यांनी भारतात सर्वप्रथम महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क प्रदान केला त्यांच्या कार्याची महती सर्वदूर पोचवत महिलांचे संघटन करून त्यांचा न्याय हक्कासाठी काम करण्याचा संकल्प यावेळी फुलशेटे यांनी केला. त्यांच्या निवडीबद्दल लिंगायत नेते प्रभाकर अण्णा इजारे, लिंगायत संघर्ष समितीचे पाथर्डी तालुकाध्यक्ष सचिन फुटाणे, उपाध्यक्ष सुहास शेळगावकर,गजानन तारापुरे,अभिजीत गुजर,संजीव चेलवे यांनी अभिनंदन केले.

# छत्रपती संभाजी महाराज म्हणजे स्वराज्यासाठी प्राणपणाने लढणारे शाक्तवीर– आबासाहेब ढवळे

## संभाजी ब्रिगेडच्या वतीने जयंती उत्साहात साजरी



**चिंचवड । प्रतिनिधी**

स्वराज्य टिकवण्यासाठी वाढवण्यासाठी अंतर्गत कलहाशी व शत्रूशी समर्थपणे व प्राणपणाने लढणारे शाक्तवीर म्हणजे छत्रपती संभाजी महाराज आहेत. त्यांच्या बलिदानातून स्वाभिमानी धगधगत्या निखाऱ्यासारखा स्वराज्याचा इतिहास रचला गेला असे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे पिंपरी–चिंचवड शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे यांनी केले. चिंचवड शाहूनगर बर्ड व्हॅली येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारकास संभाजी ब्रिगेडचे पुणे जिल्हाध्यक्ष गणेश दहिभाते यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी आबासाहेब ढवळे बोलत होते. यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक इंजि. मनोजकुमार गायकवाड, संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सतिश काळे, प्रविण कदम, जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, शहर कार्याध्यक्ष दिनेश मराठे, सचिव विशाल मिठे, संघटक सिद्धार्थ भोसले, सहसचिव जगदीश दुधभाते, उपाध्यक्ष नारायण बिराजदार, सहसंघटक तेजस गवई, जिजाऊ ब्रिगेडच्या शहराध्यक्ष शुभांगी यादव, कार्याध्यक्षा वृषाली साठे, शाम पाटील, संजय भागींदरे यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

ढवळे पुढे म्हणाले, संभाजीराजे संकटांवर केवळ स्वार झाले नाहीत; तर त्यांनी सर्व आक्रमकांच्या उरात धडकी भरवली स्वराज्याचा निम्म्या भारतात विस्तार केला केवळ ९ वर्षांच्या काळात एकही पराभव तह वा माघार नसलेल्या १२८ लढाया त्यांनी जिंकून आपल्या पित्याच्या नावाला खूप मोठा सन्मान प्राप्त करून दिला त्या छत्रपती संभाजी महाराजांचा आपल्याला वारसा आहे, हे भाग्याचे आहे.